# महाराष्ट्र शासन
# कृषि विभाग
## जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सांगली कार्यालय,
पत्ता-मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली-मिरज रोड, विजयनगर, सांगली- ४१६४१५

**Email:** dsaosangli@gmail.com दूरध्वनी क्र - ०२३३-२६०१४१२/१३


## जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) जाहिरात

आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत जिल्हास्तरावर लाभार्थ्यांना पाठपुरावा / हाताळणी सहाय्य देण्यासाठी जिल्हा संसाधन व्यक्तींची (DRP) निवड करावयाची आहे. त्यासाठी सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचनेतील अटी व शर्तीनुसार बंद लिफाफ्यातून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) | १. नामांकीत राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय व विद्यापीठ / संस्थाकडून अन्न तंत्रज्ञान / कृषि अभियांत्रिकी मधील पदव्युत्तर / पदवी<br>२. कृषि व कृषि संबधित पदव्युत्तर / पदवी इ.<br>३. इतर कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर/पदवी इ.<br>प्राधान्यक्रम :<br>अ) सेवानिवृत्त बँक/ शासकीय अधिकारी/ सनदी लेखापाल (CA)/ सल्लागार संस्था (Consultancy Firm) / बँक अधिकारी/ बैंक मित्र/ वैयक्तिक व्यवसाईक व्यक्ती / विमा प्रतिनिधी<br>ब) विद्यापीठ/ संस्था यांचेकडील अन्न तंत्रज्ञान / कृषि अभियांत्रिकी<br>क) कृषि व कृषि संबधित पदव्युत्तर/ पदवीधारक इ.<br>ड) इतर कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर/ पदवीधारक इ. | अन्न प्रक्रीया उद्योगांना तंत्रज्ञान विकसन / वृध्दी, नविन उत्पादन विकसीत करणे, उत्पादनाच्या गुणवत्तेची हमी अन्न सुरक्षा व्यवस्थापन यासाठी सल्ला देण्यासंदर्भातील ३ ते ५ वर्षाचा अनुभव तसेच सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्याचा अनुभव. |

सदर पदाकरिता अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक जाहिरात प्रसिद्धी पासून ७ दिवसा पर्यंत राहील. योजनेच्या मार्गदर्शक सूचना, अर्जाचा नमुना, सविस्तर पात्रता पारिश्रमिक (मानधन) व इतर अटी व शर्ती या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सांगली यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच केंद्र शासन अधिकृत संकेतस्थळ https://pmfme.mofpi.gov.in यावर सुद्धा उपलब्ध आहेत.

**अटी व नियम** : १. सदर पदासाठी मुलाखत घेतली जाणार आहे. वेळेनंतर आल्यास त्यांच्या मुलाखतीचा विचार केला जाणार नाही. २. ज्यांना कामाचा अनुभव आहे त्यांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. ३. निवड झाल्यानंतर संसाधन व्यक्ती यांनी कमीत कमी ५ प्रस्ताव हे डी. एल. सी. कडे मंजुरीसाठी पाठवणे बंधनकारक आहे. ४. मानधन तत्वावर तात्पुरती नेमणूक केली जाईल. ५. काम समाधानकारक नसल्यास आपली निवड रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत. ६. जिल्ह्यात कोणत्याही ठिकाणी काम करण्याची तयारी असावी. ७. निवड झालेल्या जिल्हा संसाधन व्यक्ती यांना या योजनेंतर्गत ऑनलाइन / ऑफलाईन प्रशिक्षण दिले जाईल. ८. शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यास अर्ज करता येणार नाही.

सही/-
(विवेक कुंभार)
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सांगली